**नाशिक महानगरपालिका नाशिक**
**राजशिष्टाचार व जनसंपर्क विभाग**
**कोटेशन नोटीस**

कोटेशन नोटीस राजशिष्टाचार व जनसंपर्क विभागाकडील विविध प्रकारच्या संगणक प्रिंटर्स करीता लागणारे स्पेअरपार्ट पुरविणे,तसेच टोनर रीफीलिंग करणे इत्यादी कामासाठी वार्षिक दर मंजुर करुन त्या दराने काम करणेस अनुभवी पुरवठादार/व्यावसायिक यांचे कडुन कोटेशन मागविणेत येत आहे.

| अ.नं. | तपशिल | अंदाजे प्राकलन |
|---|---|---|
| १ | नाशिक महानगरपालिकेस विविध प्रकारचे संगणक प्रिंटर्स करीता लागणारे विविध प्रकारचे स्पेअरपार्ट तसेच टोनर रीफीलिंग करणे,ड्रम युनिटबदलणे, तसेच ब्लेड बदलणे इत्यादी करीता वार्षिक दर मंजुर करुन त्या दराने आवश्यकते नुसार वेळोवेळी पुरवठा करणे बाबत. | २९,९००/- |

(अटी शर्ती )

१)कामाचे कोरे कोटेशन पत्रक (अटी शर्तीसह ( www.nmc.gov.in या संकेत स्थळावर दि.३१/०५/२०२१ रोजी दुपारी ४.०० वाजेपावेतो उपलब्ध आहे.

२)सदरचे कोटेशन पाकिट दि.०१/०६/२०२१ रोजी दु. ४.०० वा. पर्यंत राजशिष्टाचार व जनसंपर्क विभाग,१ला मजला, राजीव गांधी भवन, शरणपुर रोड, नाशिक येथे सादर करावे. विहीत मुदती नंतर आलेली कोटेशन पाकिटे स्विकारली जाणार नाही.

३)पुरवठा ऑर्डर मिळालेपासुन १५ दिवसांचे आत किंवा तत्पुर्वी संपुर्ण/आवश्यकतेनुसार मालाचा पुरवठा करावा लागेल.

४) कोटेशनमधील दर खर्चासह व सर्व करांसह दर (GST सह) नमुद करावे. कोणत्याही खर्चाची व कराची जबाबदारी नाशिक महानगरपालिकेवर राहणार नाही.

५ सदर संगणक प्रिंटर्सचे टोनर रीफीलिंग करणे,ब्लेड बदलणे,व ड्रम युनिट बदलणे बाबतची सर्व्हीस कार्यालात अथवा कार्यादेशात नमुद ठिकाणी द्यावी लागेल त्यासाठी वेगळा वाहतुक खर्च देण्यात येणार नाही.

६)यशस्वी कोटेशन धारकास सदरचे कोटेशनमधील दर व काम मान्य असले बाबतचा रक्कम रु. ५२०/- चे जनरल स्टॅम्प पेपरवर रितसर करारनामा करुन द्यावा लागेल. तसेच एक सक्षम जामीनदार द्यावा लागेल.

७)सदर कामाचे कोणतेही कोटेशन अथवा सर्व कोटेशन कोणतेही कारण न देता रद्द करणेचे अधिकार निम्न स्वाक्षरीकार यांनी राखुन ठेवला आहे.

८) मुदतीत मालाचा पुरवठा न केल्यास / काम न केल्यास / सेवा न पुरविल्यास अशा उशिरा प्राप्त झालेल्या मालावर केलेल्या कामावर / सेवा पुरविण्याच्या रक्कमेच्या ५% या प्रती सप्ताह किंवा त्याच्या भागाला याप्रमाणे दंड आकारणी करण्यात येईल व सदरची रक्कम कोटेशनधारकाकडुन वसुल करण्यात येईल.

९)कोटेशनधारकाने ज्या नावाने कोटेशन सादर केले आहे त्या नावाचे शॉप ॲक्ट लायसन्सची प्रमाणित प्रत, पॅनकार्डची प्रमाणित प्रत, GST नोंदणी दाखल्याची प्रमाणित प्रत कोटेशन सोबत जोडणे आवश्यक राहिल त्या शिवाय त्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही.

१०) सदरचे मंजुर दराने कराराचे मुदतीपर्यंत वेळोवेळी गरजेनुसार पुरवठा करणे बंधनकारक राहील.

११) काही अपरिहार्य कारणामुळे देयक अदा करणेस उशिर झाल्यास त्यावर व्याज मिळणार नाही.

१२) एकूण बिलाच्या रकमेतून शासन नियमानुसार टी डी एस कपात करण्यात येईल.

ठिकाण :- नाशिक.
दिनांक :- / ०५/२०२०

sd/-
सुरेश खाडे
अतिरिक्त आयुक्त (शहर)
नाशिक महानगरपालिका नाशिक

## नाशिक महानगरपालिका , नाशिक
## राजशिष्टाचार व जनसंपर्क विभाग
## सर्व साधारण अटी शर्ती (ई कोटेशन)

१) कोटेशन सोबतची कोटेशनधारकाची कोणतीही अट मान्य करता येणार नाही . सशर्त कोटेशन तात्काळ रद्द करण्यात येईल .

२) कोटेशन नोटिस मध्ये नमुद केलेली संख्या ही अंदाजे असुन त्यामध्ये कमी जास्त होण्याची शक्यता आहे

३) दिलेल्या मुदतीमध्ये संपुर्ण मालाचा पुरवठा करणे / काम करणे / सेवा पुरविणे आवश्यक आहे काही अपरिहार्य कारणास्तव मालाचा पुरवठा करणे शक्य नसल्यास तशी मुदतवाढ मिळणेबाबतचा आगाऊ अर्ज करणे आवश्यक राहिल. तथापी मुदतवाढ द्यावयाची किंवा कशी या बाबत महापालिकेचा निर्णय अंतिम राहील . नियतकालिके

४) ज्यांची संपुर्ण किंवा भागशः कोटेशन दर मंजुर होईल त्या कोटेशनधारकास महानगरपालिकेचे लाभात र रु ५२०/- चे जनरल **स्टप**म्पपेपर वर रितसर करारनामा करुन द्यावा लागेल .तसेच एक सक्षम जामीनदार द्यावा लागेल .

**५)** जी.एस.टी करासह कोटेशन दर नमुद करावयाचे आहे . कोणत्याही टॅक्सची जबाबदारी महानगरपालिकेवर राहणार नाही .

**६)** मुदतीत मालाचा पुरवठा न केल्यास / काम न केल्यास / सेवा न पुरविल्यास अशा उशिरा प्राप्त झालेल्या मालावर / केलेल्या कामावर / सेवा पुरविण्याच्या रकमेवर दर हजारी दर दिवसाला र . रु **१** याप्रमाणे दंड आकारणी करण्यात येईल व सदरची रक्कम कोटेशनधारकाकडुन वसुल करण्यात येईल

**७)** सदरचे मंजुर दराने कराराचे मुदतीपर्यंत वेळोवेळी गरजेनुसार पुरवठा करणे बंधनकारक राहील.

**८)** मुदतीत मालाचा पुरवठा न झाल्यास / मुदतीत काम पुर्ण न केल्यास सदरचा माल / काम कोटेशनधारकाचे जबाबदारीवर इतर ठिकाणाहुन करुन घेण्यात येईल आणि त्या कामी महानगरपालिकेस मंजुर दरापेक्षा जास्त खर्च आल्यास तो कोटेशनधारकाकडुन वसुल करण्यात येईल .

**९)** मंजुर नमुन्याप्रमाणे / स्पेशिफ़िकेशनप्रमाने मालावर पुरवठा न झाल्यास /काम न झाल्यास माल परत करण्यात येईल / अथवा सेवा नाकारण्यात येईल व त्याबाबतचा महानगरपालिकेचा निर्णय अंतिम राहील .

**१०)** कोणताही माल मंजुर केलेल्या दराने कोटेशनधारकाकडुन खरेदी करण्याची महानगरपालिकेवर सक्ती नाही . याबाबत कोटेशनधारकास नुकसानभरपाई मागता येणार नाही .

११) अटी / शर्तीमधील एखाद्या शर्तीबाबत काही सवलत देणे अथवा आवश्यक अशा काही जादा अटी घालण्याबाबत महानगरपालिकेस अधिकार राहील .

१२) कोटेशन दर मंजुर झालेनंतर सदरच्या मालाच्या दरात / कामाच्या दरात/सेवेच्या/दरात काही वाढ झाल्यास वाढलेल्या दराप्रमाणे कोटेशनधारकास जादा पसे मिळणार नाही .

१३) पुरवठाधारकाने अटिशर्तीचा भंग केल्यास त्यांचे बिलातुन रक्कम जप्त करण्यात येईल.

१४) काही अपरिहार्य कारणास्तव देयके अदा करणेस उशिर झाल्यास त्यावर व्याज अनुदेय राहणार नाही.

अतिरिक्त आयुक्त (शहर)
नाशिक महानगरपालिका नाशिक

सदरचे अटि शर्ती मी वाचल्या असुन सदरच्या अटी शर्ती मान्य व कबुल असुन त्याप्रमाने माल पुरविण्यास / सेवा पुरविण्यास / काम करण्यास मी तयार आहे . त्यासाठी स्वाक्षरी करत आहे.

निविदाधारकाची सही व शिक्का

**नाशिक महानगरपालिका नाशिक**
**राजशिष्टाचार व जनसंपर्क विभाग**
**कोटेशन फॅार्म २०२१**

**कामाचे नांव:- नाशिक मनपाच्या राजशिष्टाचार व जनसंपर्क विभागास विविध प्रकारचे संगणक प्रिंटर्स करीता लागणारे विविध प्रकारचे स्पेअरपार्ट तसेच टोनर रीफीलिंग करणेकरीता वार्षिक दर मंजुर करुन त्या दराने आवश्यकते नुसार वेळोवेळी पुरवठा करणे बाबत.**

**कामाची मुदत:-१२ महीने.**

**कोटेशन सादर करण्याची अंतिम मुदत :- दि. १/०६/२०२१ रोजी दुपारी ४ वाजेपर्यंत.**

**कोटेशन जमा करण्याचे ठिकाण:- राजशिष्टाचार व जनसंपर्क विभाग,राजीव गांधी भवन, १ ला मजला,शरणपुर रोड नाशिक.**

**उपरोक्तप्रमाणे कामाचे अटीशर्ती व स्पेसीफिकेशन नुसार साहीत्य पुरविणे कामी मी/आम्ही सर्व करांसह दर सादर करीत आहोत.**

| अ.नं. | तपशिल | तपशिल दर सर्व करासहीत | प्रमाण/एकक |
|---|---|---|---|
| १ | तपशिल लेझर प्रिंटर्स टोनर रीफीलिंग करणे कॅनन/सॅमसंग/ब्रदर्स मेक | | प्रति नग |
| २ | लेझर प्रिंटर्स ब्लेड बदलणे कॅनन/सॅमसंग/ब्रदर्स मेक | | प्रति नग |
| ३ | लेझर प्रिंटर्सचे ड्रम बदलणे कॅनन/सॅमसंग/ब्रदर्स मेक | | प्रति नग |

**आम्ही उपरोक्त कामासाठी सर्व करांसह व खर्चासह वरीलप्रमाणे दर सादर करीत आहोत. आम्ही कोटेशन नोटीस मधील अटी - शर्ती वाचल्या असुन त्या आम्हास मान्य व कबुल आहेत. सदरच्या अटी शर्थीस अधिन राहुन उक्त दराने काम करण्यास तयार आहोत. तरी आम्हाला कामाचा आदेश मिळावा ही नम्र विनंती.**

**कोटेशन धारकाचे नाव व पत्ता:-**

**संपर्क क्र. :-**
**ठिकाण :-**
**दिनांक :-**

**कोटेशन देणा-याची सही व शिक्का**

---

**(कार्यालयीन उपयोगाकरीता)**